# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### औसा (जि.लातूर) भूकंपपुनर्वसित जुन्या गावठाणात घन वृक्ष लागवड करण्याबाबत

**(१) ४५९०३ (२५-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) तालुक्यातील भूकंपपुनर्वसित गावातील जुन्या गावठाण जमिनी वन विभागाकडे व सामाजिक वनीकरण विभागाकडे वर्ग झाल्या असून सदरील जमिनीत वृक्ष लागवड करण्याबाबत तसेच ग्रामीण रस्ते व शिव रस्ते यांच्या दुतर्फा औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१९ ते आजतागायत झालेल्या तालुका स्तरीय व जिल्हास्तरीय आढावा बैठकीत मागणी केली असतांनाही अनेक भूकंपपुनर्वसित जुन्या गावातील गावठाण जमिनीत व शीवरस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील वन विभागाकडे व सामाजिक वनीकरण विभागाकडे शासनाने गावठाण व गायराण जमिनीचे वर्ग केलेले क्षेत्र किती आहे व त्यापैकि किती क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित क्षेत्रावर वृक्ष लागवड प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील पुनर्वसित जुन्या गावठाणच्या एकूण १२ गावातील ३७.२४ हे.आर. क्षेत्र सामाजिक वनीकरण विभागास तसेच १० गावातील ९३.५३ हे.आर. क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. त्यापैकी सामाजिक वनीकरण विभागाने ३३.४७ हे.आर. क्षेत्र ताब्यात घेऊन संपूर्ण क्षेत्रात वृक्ष लागवड करण्यात आली आहे. तसेच प्रादेशिक वनविभागास हस्तांतरीत केलेल्या १० गावांतील ९३.५३ हे. आर. क्षेत्रापैकी ७४.०७ हे. प्रत्यक्ष ताब्यात घेण्यात आले आहे. त्यापैकी ३४ हे.आर. क्षेत्रावर वृक्ष लागवड केलेली आहे. उर्वरित ८.४० हे.आर. क्षेत्र हे मंदीर परिसर व रोपवनास अयोग्य असून उर्वरित ३१.६७ हे.आर. क्षेत्रावर सन २०२३ च्या पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवड करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच औसा तालुक्यातील वन परिक्षेत्रांतर्गत सन २०१९-२० ते सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्य योजनेतुन ग्रामीण रस्ते,शेतरस्ते व शीवरस्ते यांच्या दुतर्फा वृक्ष लागवडीची कामे केली नसल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे आहे,

लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुक्यातील १४ गावातील एकूण गावठाण ९७.७५ हे.आर. क्षेत्र वन विभागाकडे प्राप्त आहे. त्यापैकी औसा तालुक्यात ३४ हेक्टर क्षेत्रावर व निलंगा तालुक्यातील ९ हे.आर. असे एकूण ४३ हे.आर. गावठाण क्षेत्रावर वनविभागाकडून वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हाधिकारी, लातूर यांचे आदेशान्वये एकूण ३५४४.७७ हे. आर. गायरान क्षेत्र वन विभागास वर्ग करण्यात आलेले आहे. त्यापैकी वन विभागाकडे १२२७.९६ हे.आर. क्षेत्र प्रत्यक्षात ताब्यात घेऊन १०५४.५८ हे.आर. गायरान क्षेत्रावर वन विभागामार्फत वृक्ष लागवड करण्यात आली आहे. उर्वरीत वन विभागाच्या ताब्यातील १७३.३८ हे.आर. गायरान क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्याचे

प्रस्तावित आहे. तसेच उर्वरीत २३१६.८१ हे.आर. गायरान क्षेत्र महसूल विभागाकडून ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) व (४) लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा तालुक्यातील जिल्हाधिकारी,लातुर यांच्या हस्तांतरीत आदेशातील नमुद केलेल्या एकूण ११७.२१ हे. आर. क्षेत्रापैकी उस्मानाबाद वन विभागाकडे ९७.७५ हे. क्षेत्र प्रत्यक्षात ताब्यात मिळाले असून त्यापैकी ४३.०० हे.आर. क्षेत्रावर वन विभागाकडून वृक्ष लागवड पूर्ण करण्यात आली आहे. प्रत्यक्षात ताब्यात मिळालेल्या ९७.७५ हे. क्षेत्रापैकी ११.९२ हे.आर. हे लागवड अयोग्य क्षेत्र आहे. उर्वरित ३.७७ हे.आर. क्षेत्र हे मंदीर परिसर असल्यामुळे वृक्ष लागवड करण्यास अयोग्य आहे. तसेच सन २०२२-२३ मध्ये ३७.०५ हे. आर. क्षेत्रावर जिल्हा वार्षिक योजना/राज्य योजनेतून वृक्ष लागवडीसाठी निधीची तरतुद करण्यात येवून वृक्ष लागवड पूर्ण करण्याची नियोजन करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

---

## तोरणे (ता.वाडा, जि.पालघर) गावात लोखंड उत्पादन कंपनीचे काम अनधिकृतरित्या सुरु असल्याबाबत

**(२) ४६६३१ (०४-११-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोरणे (ता.वाडा, जि.पालघर) गावाच्या हद्दीत लोखंड उत्पादित करणाऱ्या कंपनीने विस्तारीकरणाचे काम सुरू करतांना ग्रामपंचायत व अन्य प्रशासकीय यंत्रणांची परवानगी घेतली नसल्याचे निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामस्थांनी कंपनीचे काम तात्काळ बंद करावे अशी लेखी मागणीच्या अनुषंगाने प्रदुषण नियंत्रण मंडळ व महसूल विभागाने प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार तहसिलदार यांनी सदर कंपनीचे तात्काळ काम बंद करावे असे आदेश दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी मालक खोटे पुरावे व बनावट व्यक्तिंना ग्रामस्थ म्हणून भासवून प्रशासनाची दिशाभूल करीत असल्याचे सदर गावातील ग्रामस्थांनी दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-१२-२०२२) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे तोरणे, ता. वाडा, जि. पालघर येथील स. नं. ११/१/अ मध्ये शिवकृपा स्टील ॲन्ड अलाईज प्रा. लि. या कंपनीने विस्तारीकरणाच्या बांधकामासाठी जिल्हाधिकारी, पालघर यांची परवानगी व संबंधित गावाच्या ग्रामसभेचा ठराव न घेतल्यामुळे बांधकाम बंद करण्याचे आदेश तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०३.०१.२०२२ रोजी दिले आहेत. तसेच मौजे तोरणे, ता. वाडा, जि. पालघर येथील स्थानिक ग्रामस्थ यांनी उक्त कंपनी मोठ्या प्रमाणात प्रदुषण करीत आहे, स्थानिक तरुणांना रोजगाराची संधी दिलेली नाही, CSR फंड गावासाठी वापरलेला नाही व इतर बाबी नमूद करून कंपनीला नवीन उद्योग परवानगी देण्यात येवू नये, असे निवेदन तहसिलदार, वाडा यांना दिनांक २८.०२.२०२२ रोजी दिले आहे.

तहसिलदार, वाडा यांच्याकडील दिनांक ०३.०१.२०२२ च्या आदेशाच्या अनुषंगाने कंपनीने विस्तारीकरणाचे काम बंद केले असून कंपनीकडून अनधिकृत बांधकामाबाबत दंडाची रक्कम रुपये ४१५००/- मात्र वसूल करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांनी सदर कंपनीला दिनांक ०४.०४.२०२२ रोजी कंपनी बंद करण्याचे आदेश दिले होते. तद्नंतर, दिनांक १२.०४.२०२२ रोजीच्या आदेशानुसार अटींच्या अधीन राहून कंपनी पुनश्च: सुरुवात करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्रस्तावाधीन जागेची स्थळ पाहणी मंडळ अधिकारी, कोने यांनी दिनांक ०७.०७.२०२२ रोजी केली असून कंपनीचे बांधकाम अर्धवट स्वरुपात असून विस्तारीकरण केलेल्या जागेत कोणत्याही प्रकारचे उत्पादन सुरु केल्याचे दिसून येत नाही.

---

## कुडे (ता.जि.पालघर) गावात वन विभागाचा भूखंड बळकावून भूमाफियांकडून झाडांची कत्तल होत असल्याबाबत

**(३) ४७८०६ (३१-१०-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडे (ता.जि.पालघर) गावातील हद्दीत वन विभागाच्या १२२ सर्व्हे क्रमांकाचा भूखंड बळकवला असून भूमाफियांकडून घातक रसायनांचा वापर करुन झाडांची विनापरवाना कत्तल करण्यात येत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी वन विभागाकडे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर भूमाफीयांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

मौजे कुडे ता. जि. पालघर येथील स.नं.१२२ चा भूखंड बळकावून सदर भूखंडामधील वृक्षांची घातक रसायनाचा वापर करुन तेथील वृक्षांची अनधिकृतपणे कत्तल केल्याबाबत कुडे गावचे ग्रामस्थ यांनी वनक्षेत्रपाल, दहिसर कार्यालयात तक्रार अर्ज दिलेला आहे.

(२) मौजे कुडे ता. जि. पालघर येथील स.नं.१२२ ची पाहणी केली असता, अवैध वृक्षतोड करण्यासाठी झाडांना इजा पोहचवत असल्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

(३) मौजे कुडे ता. जि. पालघर येथील स.नं. १२२ ची पाहणी केली असता, जागेवर एकूण २३ वृक्षांना ड्रिल मशीनच्या सहाय्याने छिद्रे पाडून त्यात घातक रसायन भरुन झाडांची अवैध वृक्षतोड करण्यासाठी इजा पोहचविल्याचे निदर्शनास आले असल्याने संबंधिताविरुध्द राऊंड गुन्हा क्र.सी-१२/२०२२, दिनांक ०८.०५.२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून, आरोपीवर दिनांक १०.०८.२०२२ रोजी मा. प्रथम न्यायदंडाधिकारी, पालघर यांचे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अकोला जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहिम असफल झाल्याबाबत.

**(४) ४९००४ (२५-०९-२०२२). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अकोला जिल्ह्यात वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाची मोहिम असफल झाल्याची बाब माहे जून,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जागतिक वन दिनाचा मोठ्या प्रमाणात कार्यक्रम साजरा करण्यात येत असताना अकोला जिल्ह्यातील लाखो रोपे पाणी न मिळाल्याने मृत अवस्थेत आढळली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला जिल्ह्यात लावण्यात आलेले वृक्षाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वन विभागामार्फत कोणती उपाययोजना केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यात सन २०२१-२२ मध्ये माहे मे-२०२२ अखेर वृक्ष लागवड केलेल्या एकूण रोपापैकी जिवंत रोपांची संख्या टक्केवारी ७६.५५% इतकी आहे. सदर जिवंत रोपांची टक्केवारी पहाता अकोला जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहीम सफल झाली आहे.

(२) हे खरे नाही.

अकोला जिल्ह्यातील रोपवनात विहीत कालावधीत व आवश्यक त्या प्रमाणात नियमित पाणीपुरवठा करण्यात येत असल्यामुळे रोपाना पाणी न मिळाल्याने रोपे मृत अवस्थेत आढळल्याची बाब दिसून येत नाही.

(३) अकोला जिल्ह्यात सामजिक वनीकरण विभागाने लागवड केलेली वृक्ष लागवड सुस्थितीत असून सन २०२१-२२ मध्ये माहे मे-२०२२ अखेर वृक्ष लागवड केलेल्या एकूण रोपापैकी जिवंत रोपांची संख्या टक्केवारी ७६.५५% इतकी आहे.

(४) रोपे लागवड केल्यानंतर त्यांचे संरक्षण व संगोपन व्हावे यासाठी रोपवन संरक्षण मजूर ठेवण्यात येतात व रोपांना नियमित पाणीपुरवठा व्हावा यासाठी सदर कामाचा अंतर्भाव अंदाजपत्रकात करण्यात येतो. त्यानुसार रोपांना नियमित पाणी देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धनगर व तत्सम विमुक्त भटक्या जातींच्या नागरिकांना निवासविषयक आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी-सुविधा देण्याबाबतचा

**(५) ४९८४६ (१८-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर व तत्सम विमुक्त भटक्या जातींच्या नागरिकांना निवासविषयक आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी-सुविधा देण्याबाबतचा सुधारित आदेश शासनाने दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार देय ठरलेल्या सोयी-सुविधांचा तपशील काय आहे, तसेच सदर आदेशातील शिफारशींची प्रत्यक्ष अंमलबजावणी केव्हापासून सुरु होणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील धनगर समाजाच्या मागण्यांबाबत

**(६) ४९९०४ (१८-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाला उद्भवणाऱ्या समस्या व प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास वारंवार निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच धनगर समाजाच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२९-०५-२०२३) :** (१) धनगर समाजाच्या विविध मागण्यांबाबत लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी मा. मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेली दिनांक २४ जुलै, २०२२ व इतर दिनांकाची निवेदने या विभागास प्राप्त झाली आहेत.
(२) व (३) सदरहू निवेदनांव्दारे, धनगर समाजास अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळणे, धनगर वाडयांवर मुलभुत सुविधा-पिण्याचे पाणी, प्राथमिक शिक्षण, वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे, धनगरांसाठी चराऊ कुरणे राखीव ठेवणे, रोजगार निर्मिती करणे, बिनव्याजी भांडवल उपलब्ध करून देणे, त्यांच्या जिविताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे, त्यांच्यावरील सर्व गुन्हे मागे घेणे, राजमाता अहिल्यादेवी यांचा पुतळा उभा करणे, अहमदनगर जिल्हयाचे नामांतरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करणे, बोरघाटास शिंगरोबा धनगर यांचे नाव देणे, इ. विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. सदरहू मागण्यामधील विषय शासनाच्या विविध विभागांशी संबंधित असल्याने त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधितांना परस्पर कळविण्याबाबत संबंधित विभागांना कळविण्यात आले आहे.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे पेण (जि.रायगड) येथील वन जमिनीवर जागतिक दर्जाचे इको पार्क उभारण्याच्या निर्णयाबाबत**

**(७) ५००२५ (१८-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पेण (जि.रायगड) येथील वन जमिनीवर जागतिक दर्जाचे इको पार्क उभारण्याचा निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार जागतिक दर्जाच्या इको पार्क उभारणीस किती कालावधी लागेल व त्याची रुपरेषा काय आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी उभारणीस अंदाजीत खर्च किती अपेक्षीत आहे, तसेच त्याठिकाणी पर्यटकांना कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :**(१) वन विभागामार्फत मौजे पेण (जि.रायगड) येथील वन जमिनीवर जागतिक दर्जाचे इको पार्क उभारण्याचा निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमजळगाव (ता.गेवराई, जि.बीड) येथील अवैध वाळू उत्खनन करणारे व जप्त केलेले दोन पोकलेन व एक जेसीबी चोरीला गेल्याबाबत**

**(८) ५०९९६ (२०-०१-२०२३). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमजळगाव (ता.गेवराई, जि. बीड) येथील गोदावरी नदीपात्रात सहाय्यक पोलीस अधीक्षक बीड यांनी जप्त करून महसूल विभागाच्या ताब्यात दिलेले अवैध वाळू उत्खनन करणारे दोन पोकलेन व एक जेसीबी चोरीला गेल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त चोरीला गेलेले पोकलेन व जेसीबी याची माहिती माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे चार महिन्यांनी महसूल विभागास समजली व माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल झाला असल्याचेही निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चोरीला गेलेले पोकलेन व जेसीबी महसूल विभागाने सुरक्षित ठिकाणी न ठेवता चोरीला जावेत या उद्देशाने नदीपात्रातच ठेवून दिले असेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महसूल अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे चोरीला गेलेल्या दोन कोटी रुपयांच्या मुद्देमालावर शासनाने आकारलेल्या दंडात्मक रकमेची वसुली करण्यासंदर्भात अधिकाऱ्यांच्या वेतनामधून कपात करून सदर अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०१-२०२३) :** (१),(२),(३),(४) व (५) मौजे संगमजळगाव, ता. गेवराई या वाळूघाटावर सहायक पोलिस अधिक्षक, बीड व उपविभागीय अधिकारी, बीड यांच्या संयुक्तरित्या केलेल्या कारवाईमध्ये सदर वाळू घाटातून अवैध उत्खनन करताना ०८ ट्रक्टर, ०३ पोकलेन व ०१ जेसीबी आढळून आलेली आहे. त्यापैकी ०८ ट्रक्टर जप्त करण्यात येऊन तहसिल कार्यालय, गेवराई येथे लावण्यात आले. सदर घाटात अवैध उत्खनन करताना आढळून आलेल्या ०३ पोकलेन व ०१ जेसीबी हे अवजड संयंत्र असल्याने व त्यांची चावी उपलब्ध नसल्याने सदर यंत्रसामग्री वाळूघाटावर ठेवण्यात आली. परंतू तदनंतर ०३ पोकलेन व ०१ जेसीबी चोरी गेल्याचे आढळून आल्याने गेवराई पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मौजे संगम जळगाव या घाटावर अवैध उत्खनन करताना आढळून आलेली ०३ पोकलेन, ०१ जेसीबी व ०४ ट्रॅक्टर ही यंत्रसामग्री लिलावधारक यांनी लिलावात घेतलेल्या वाळू घाटावर आढळून आल्याने संबंधित लिलावधारक व वाहन मालक यांच्यावर रूपये ३८,००,०००/- एवढ्या रकमेची दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच लिलावधारकाने वाळू घाट मंजूरी आदेशातील अटींचा भंग केल्याने रूपये १०,८०,०००/- एवढी अनामत रक्कम जिल्हाधिकारी, बीड यांनी जप्त करण्यात आली आहे.

---

## गडचिरोली जिल्ह्यात पुनर्वसित बंगाली गावातील अतिक्रमित जमिनीचे पट्टे पुनर्वसित धारकांना देण्याबाबतत

**(९) ५११७३ (२७-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात केंद्र शासनाने सन १९६४ ते १९७१ या कालावधीत बंगाली लोकांचे पुनर्वसन करुन भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २७ नुसार दिनांक १५ जुलै, १९६५ रोजी वा त्यासुमारास २५५५६ हेक्टर जमीन राखीव वने निर्वनिकरण करुन पुनर्वसीत धारकांना राहण्यासाठी गावठाण व शेतजमीनकरीता वाटप केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाटपानंतर निर्वनिकरण केलेल्या पडीत जमीन सर्वे नंबरवर मोठे कुंटुंब सन १९७०-७१ पासून कुंटुंबाचे पालन पोषण करुन अतिक्रमानाची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन जमाबंदी अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक १७ जानेवारी, १९९१ ला या जमिनीवर कोणाचाही दावा व हक्क असल्यास आक्षेपाबाबत प्रसिद्धी दिली व काही बंगाली शेतकऱ्यांनी या जमिनीवर अतिक्रमणाबाबत लेखी हक्क आक्षेप नोंदविला असून यावर अजूनपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू वन मंत्री, महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव, वने, महाराष्ट्र शासन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ज्या शेतकऱ्यांकडे सन १९९०-९१ पर्यंतचे अतिक्रमणाबाबत शासकीय पुरावा असेल त्यांना पात्र ठरवून अतिक्रमणाचे पट्टे दिले जाईल अशी कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी पुनर्वसित बंगाली गावातील अतिक्रमित जमिनीचे पट्टे देण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय व शासनाची भूमिका काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१०-०५-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

गडचिरोली वनवृत्ताच्या कार्यकक्षेतील राखीव क्षेत्रापैकी २५५५६.४० हे.आर वन क्षेत्राचे दिनांक १५.७.१९६५ च्या अधिसूचनेव्दारे निर्वनिकरण करण्यात आले. सदर निर्वनिकरण करण्यात आलेल्या क्षेत्रापैकी १६५७२.१२ हे.आर क्षेत्र

महसूल विभागामार्फत शेतीसाठी व निवासाकरीता पट्टे वाटप करण्यात आले आहेत. उर्वरित शिल्लक क्षेत्र महसूल विभागाकडून पुन्हा वन विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून सदर क्षेत्र "राखीव वन" म्हणून घोषित करण्याची कार्यवाही दिनांक ८.११.१९९० च्या अधिसूचनेन्वये सुरु करण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५)

प्रस्तूत क्षेत्राबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ११, १२, १५, १६ अंतर्गत वन जमाबंदी अधिकारी, नागपूर यांनी पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे अपील दाखल करण्यात आली आहेत.

याबाबत, जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या स्तरावर दिनांक ३.११.२०१८ ला आयोजित सुनावणी पत्रकामध्ये हक्क व दावे संबंधात पुरावे सादर करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. सदर प्रकरणात सुनावणी दरम्यान प्राप्त झालेले लेखी दावे व हक्काबाबत सादर केलेल्या पुराव्यांनुसार अतिक्रमण क्षेत्राबाबत मालकी अधिकार/ हक्क असल्याचे सिद्ध झाले नाही. फक्त अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे.

अपील प्रकरणात जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक २७.१२.२०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार वन जमाबंदी अधिकारी, नागपूर यांच्याव्दारे फेरचौकशी करणे अपेक्षित आहे. तथापि, तत्पूर्वी संबंधित गावातील गटनिहाय अतिक्रमण क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे.

याबाबत मा.मंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.१२.२०२२ रोजी बैठक संपन्न झाली असून मोजणी फी प्राप्त झाल्यावर अधीक्षक भूमि अभिलेख, गडचिरोली यांनी क्षेत्राची मोजणी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यात जिल्हा कृषी अधिकारी यांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(१०) ५१२१४ (१९-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात जिल्हा कृषी अधिकारी, हिंगोली यांच्या ढिसाळ व मनमानी कारभाराबाबत स्थानिक शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे केल्यानंतर त्याची तत्काळ मुदतपूर्व बदली करण्याची मागणी कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरित पाठविण्यात यावेत, असे आदेश आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अवर सचिव, कृषि विभाग, मंत्रालय यांनी दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार आयुक्तांनी शासनास स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर केले आहेत काय, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) यासंदर्भात आयुक्त (कृषि) यांनी शासनास अभिप्राय सादर केले असून याबाबत शासनस्तरावर नियमोचित कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील जलंब माटरगांव, पिंपळगाव, नांदुरा व शेगाव या मार्गावरुन रेतीची तस्करी होत असल्याबाबत

**(११) ५१२३२ (२०-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील जलंब माटरगांव, पिंपळगाव, नांदुरा व शेगाव या मार्गावरुन खामगाव शहरात नियमांचे उल्लंघन करुन रेतीमाफीयांकडून सुमारे ७२-७५ वाहनाद्वारे मोठया प्रमाणात रेतीची अवैध तस्करी केली जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०१-२०२३) :**(१), (२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील जलंब माटरगांव,पिंपळगाव, नांदुरा व शेगाव या मार्गावरुन खामगाव शहरात नियमांचे उल्लंघन करुन रेतीमाफीयांकडून सुमारे ७२-७५ वाहनाद्वारे मोठया प्रमाणात रेतीची माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये अवैध तस्करी केली जात असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

बुलढाणा जिल्ह्यात अवैध गौणखनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्याकरीता तालुका स्तरावर तालुका भरारी पथके स्थापन केली आहेत.

बुलढाणा जिल्हयात अवैध गौण खनिज प्रकरणात माहे एप्रिल २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर एकूण ९९ प्रकरणात रू.७१ लाख दंडाची रक्कम वसुल करून शासन जमा करण्यात आली आहे.

---

## मुळावा (जि.यवतमाळ) येथील दत्त मंदिर शिवारातील वानेगांव रस्त्यालगतचा अवैध लाकूड साठा वन विभागाने जप्त केल्याबाबत

**(१२) ५२३३२ (२७-०१-२०२३). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळावा (जि.यवतमाळ) येथील दत्त मंदिर शिवारामागे वानेगाव रस्त्यावरील दोन व्यापाऱ्यांचा अवैध लाकुड साठ्यावर वन विभागाने दिनांक ७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून अडजातीच्या लाकडाचा साठा जप्त करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने किती लाकूड साठा जप्त करण्यात आला व दोषी व्यापाऱ्यांवर विनापरवानगी वृक्षतोड व वाहतूक केल्याप्रकरणी वन कायद्यांतर्गत शासनाने कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :**(१) पुसद वनविभागातील उमरखेड वनपरिक्षेत्रांतर्गत मुळावा येथील दत्त मंदीर शिवारामध्ये दिनांक ०७.११.२०२२ रोजी वनविभागाने कारवाई करुन लाकुड साठा जप्त केला आहे.

(२) सदर प्रकरणी आडजात इमारती माल ५.४१४ घ.मी. व १० जळतन बिटा जप्त करण्यात आले आहे.सदर गुन्ह्यात एकूण ५ कास्तकारांच्या विरुध्द वनगुन्हा नोंद करण्यात आला असुन त्यांच्याकडून अवैध वृक्षतोड प्रकरणी महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ नुसार प्रत्येकी रु.१०००/- या प्रमाणे रु.५०००/- तसेच विनापरवानगी वाहतुकीच्या अनुषंगाने भारतीय वन अधिनियम,१९२७ नुसार प्रत्येकी रु.१०००/- या प्रमाणे एकूण रु.५०००/- दंड वसुल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती जिल्ह्यातील पर्जन्यमापक यंत्रणा नादुरुस्त असल्याबाबत

**(१३) ५२६०४ (२४-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टी व संततधार पावसाने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना प्रशासन व पर्जन्यमापण हाताळणाऱ्या यंत्रणेच्या बेजबाबदारपणामुळे मोठ्या प्रमाणात अडचणीचा सामना करावा लागल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच तळेगाव मोहना (ता.चांदूर बाजार, जि.अमरावती) येथील स्वयंचलीत हवामान केंद्राची शेतकऱ्यांमार्फत पाहणी करुन तेथील स्वयंचलीत हवामान केंद्राच्या अवतीभोवती गाजर गावत व इतर उंच झाडे असल्याचे निदर्शनास आल्याने तेथील यंत्राच्या बॅटरीवर कार्बन चढले असून पर्जन्यमापण यंत्रात पालापाचोळा आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पर्जन्यमापण यंत्र परिसरातील वाढलेल्या झाडांमुळे गावात पावसाच्या आकडेवारीच्या नोंदीत तफावत असल्याची शक्यता असल्याचे तहसीलदार चांदूर बाजार याने जिल्हाधिकारी, अमरावती यांना पाठवलेल्या अहवालात नमूद केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार नादुरुस्त पर्जन्यमापण यंत्र दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०८-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत सदर हवामान केंद्र चालू स्थितीत आहे. तथापि मे. स्कायमेट वेदर सर्व्हिसेस प्रा. लि. यांचेकडील प्राप्त अहवालानुसार सदर केंद्र योग्य जागेत स्थलांतरीत करणेसाठी शिफारस केलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) चांदूर बाजार तालुक्यातील करजगाव या महसुल मंडळातील पावसाच्या नोंदी गृहीत धरून महसूल मंडळ तळेगाव मोहणा व आसेगाव पूर्णा हे महसूल मंडळात झालेले नुकसान हे अतिवृष्टीमुळे झाल्याबाबतचे संयुक्त स्वाक्षरी अहवाल मदत व पुनर्वसन विभागास सादर करण्यात आला आहे. तसेच नादुरुस्त पर्जन्यमान यंत्र दुरुस्त करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात बारी समाज विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत

**(१४) ५२६२८ (१८-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोर्शी (जि.अमरावती) येथील अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, ओबीसी आर्थिक विकास महामंडळ या धर्तीवर राज्यामध्ये महाराष्ट्र बारी समाज विकास महामंडळ स्थापन करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २० सप्टेंबर २२ रोजी वा त्यासुमारासदिले आहे ,हे खरे आहे काय

(२) असल्यास, राज्यामध्ये विशेषतः विदर्भामध्ये पानशेती, पान व्यवसाय व पिपरी (औषधीयुक्त साधन) व्यवसाय करणाऱ्या बारी समाजाच्या आर्थिक सामाजिक उत्थानासाठी सन १९४७ पासून एकही शासन निर्मित विकास महामंडळ व योजना कार्यान्वित नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, बदलत्या व्यावसायिक व सामाजिक परिप्रेश्यात बारी समाजाचे परंपरागत व्यवसाय डबघाईला येत असताना या समाजातील होतकरू तरुणांच्या शैक्षणिक, व्यावसायिक व नोकरी संदर्भात मोर्शी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वतंत्र बारी समाज विकास महामंडळ स्थापन करावे या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२१-०४-२०२३) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) व (३) बारी समाज हा इतर मागास प्रवर्गामध्ये मोडतो. इतर मागास प्रवर्गाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उत्थानासाठी शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर ,१९९८ अन्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयातून इतर मागास प्रवर्गाच्या उत्थानाच्या योजनांविषयक कामकाज हाताळण्यात येते.त्यामुळे बारी समाज विकासासाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सांगली परिसरात हवामान अधारित अंदाज घोषित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१५) ५२६७१ (२४-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सांगली परिसरातील व्हॉटअॅप व फेसबुकवरुन प्रसारित केल्या जाणाऱ्या हवामान अंदाजावर द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये असे आवाहन द्राक्ष बागायतदार संघाने केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात राज्यातील सर्व हवामान तज्ञांनी भावनेच्या भरात विसंगत हवामान अंदाज वर्तवू नयेत व कमी वेळात बागांची छाटणी झाल्याने बाजारभावात अस्थिरता निर्माण होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होते, तसेच शेतकऱ्यांनी ही समाज माध्यमांवरील अंदाजाविषयी भीती बाळगू नये असे आवाहन द्राक्ष बागातदार संघाने शेतकऱ्यांना केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणात स्वयंघोषित हवामान तज्ञांचे अंदाज चुकीचे होत असल्याने शासनाने (अधिकृत) हवामान अधारित अंदाज घोषित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२४-०४-२०२३) :**१) व २) होय, हे खरे आहे.
३) ग्रामीण कृषि मौसम सेवा Agromet Field Unit कोल्हापूर, विभागीय कृषि संशोधन केद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर यांचेमार्फत हवामान अंदाजावर आधारीत एग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटीन सांगली जिल्ह्यातील कृषि विभागाच्या कार्यालयांना पाठविले जाते. तसेच शेतकऱ्यांच्या व्हॉटस्ॲप ग्रुपवर पाठविले जाते व वेळोवेळी प्रचार-प्रसिद्धी केली जाते.
४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रोहा (जि.रायगड) तालुक्यात उपविभागीय अधिकारी पद तातडीने भरण्याबाबत

**(१६) ५२८०७ (२९-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यात गेल्या अनेक महिन्यापासून उपविभागीय अधिकारी हे रिक्त पद भरण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पद रिक्त असल्यामुळे चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना दाखले मिळण्यास विलंब होत असून नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विद्यार्थ्यांची व नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेता रोहा येथील उपविभागीय अधिकारी पद तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) शासन आदेश दिनांक ०९.१२.२०२२ अन्वये उपविभागीय अधिकारी, रोहा हे पद भरण्यात आले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील भटक्या जमाती क प्रवर्गातील समाजासाठी**
**न्यूक्लिअस बजेटमधून निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(१७) ५३१३९ (२९-०१-२०२३). श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील भटक्या जमाती ‘क’ प्रवर्गातील समाजासाठी कृषी पंपांना वीज पुरवठा व घरगुती वीज जोडणी देण्याकरिता न्यूक्लिअस बजेट मधून निधी उपलब्ध होण्याबाबत सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील १४ महिन्यांपासून निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला नसल्याने या प्रवर्गातील समाजावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धरमतर (ता.अलिबाग जि.रायगड) येथील जेटी बंदरावर पीएनपी कंपनीने**
**शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(१८) ५३३०२ (२९-०१-२०२३). श्री.महेंद्र दळवी (अलिबाग) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्याकडील पीएनपी बंदराच्या सुनावणी संदर्भातील कार्यालयीन आदेशामध्ये पीएनपी कंपनीच्या विस्तारित प्रकल्प हा गट क्रमांक ३४६ या सरकारी जमीनीमधील असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणात शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत असल्याने याला जबाबदार कोण तसेच सदर जमीन शासनाने ताब्यात घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२६-०४-२०२३) :** (१) (२) व (३) मे.पी.एन.पी. बंदराच्या विस्तारित प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यात आली होती. सदर सुनावणी दरम्यान गट क्र.३४६ च्या जागेबाबत आक्षेप घेण्यात आला होता. सदर प्रकल्पास पर्यावरण, वने व वातावरणीय बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक २०.०८.२०२० अन्वये अनुमती प्रदान केलेली आहे.

तहसिलदार, अलिबाग यांनी मे.पी.एन.पी. मेरीटाईम सर्व्हिसेस प्रा.लि. यांना कंपनीने सन २०००-२००१ पासून

विनापरवाना औद्योगिक वापर चालू केल्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ नुसार रक्कम रु.१,५२,५२,१६०/- शासन जमा करणेबाबत दिनांक ३०.०६.२००९ ला नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुषंगाने एकूण रु.९०,००,०००/- सदर कंपनीने शासनजमा केले असून सन २००१-२००९ या कालावधीतील उर्वरीत रक्कम रु.६२,५२,१६०/- वसूल करण्याची कार्यवाही तहसिलदार, अलिबाग यांचेकडून सुरु आहे.

तसेच सन २००९-२०१० ते २०२१-२०२२ या कालावधीतील अनधिकृत बिनशेती वापराच्या अनुषंगाने उक्त कंपनीकडून रक्कम रुपये १,११,३८,०८०/- शासन जमा करण्यात आली आहे.

एकूण १६-९४.० हे.आर जमीन पी.एन.पी. मेरीटाईम सर्व्हिसेस कंपनीच्या वहिवाटीखाली असल्याने, सदरचे क्षेत्र त्यांना भाडेपट्टयाने देणेकरीता सदरचे क्षेत्र महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वर्ग करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांनी दिनांक २९.०३.२०१२ व दिनांक ०४.०४.२०१२ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुषंगाने शासनस्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे.

मौजे शहाबाज, ता.अलिबाग जि.रायगड येथे मे.पी.एन.पी मेरीटाईम प्रा.लि.शहाबाज या कंपनीने कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता केलेला शासकीय मिळकतीचा वापर व केलेले बांधकामाबाबत मा.राष्ट्रीय हरित न्यायालय, बेंच पुणे यांचेकडे दाखल अर्ज क्र.९५/२०१४ मध्ये संकीर्ण अर्ज क्र.२६३/२०१७ च्या संदर्भात दि.२२.०९.२०१७ रोजी पारीत आदेश क्र.३१ मध्ये सदर बांधकामाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेबाबत कोणतेही आदेश पारीत नसल्याने सदर आदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन मिळणेकामी उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांनी दिनांक १२.०८.२०२२ च्या पत्रान्वये पर्यावरण विभाग यांचेकडे विनंती केली आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त होताच नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## मौजे आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथे पावसाळ्यामध्ये रेकॉर्डला १० हेक्टर लागवड दाखवून प्रत्यक्षात ७ हेक्टर लागवड झाल्याबाबत

**(१९) ५५१३४ (२९-०१-२०२३). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर), श्री.संजय बनसोडे (उदगीर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथे सन २०१९ या कालावधीत पावसाळ्यात गट नं.१४० या जंगलामध्ये १० हेक्टरपैंकी ७ हेक्टर जमिनीवर विविध प्रकारच्या रोपांची लागवड करण्यात आली व त्यासंदर्भातील जंगलाचा स्क्रीन चेकिंग माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केला असून उर्वरित ३ हेक्टर जमिनीवरील कामाचे बजेट उचलून परस्पर विल्हेवाट लावून शासनाच्या निधीचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द तेथील ग्रामस्थांनी तक्रारी करुन त्यांच्याविरुद्ध चौकशी व कारवाईची मागणी केली असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२४-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही,

मौजे आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथे सन २०१९ च्या पावसाळ्यात १० हेक्टर क्षेत्रावर वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. सदर वृक्ष लागवडीबाबत नांदेड वन विभागाकडुन दिनांक १०.०७.२०२२ रोजी तपासणी करण्यात आलेली आहे. त्यानुसार एकुण १० हे. वर वृक्ष लागवड पूर्ण करण्यात आलेली असल्यामुळे शासनाच्या निधीचा गैरव्यवहार करण्यात आलेला नाही.

(२), (३) व (४) मौजे आनंदवाडी (ता.चाकूर, जि.लातूर) येथील वृक्षलागवडीबाबत दिनांक १७.१०.२०२२ रोजी प्राप्त तक्रारीनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत पशुवैद्यकीय संस्थांमधील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२०) ५५३६५ (२९-०१-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हा परिषद अंतर्गत पशुवैद्यकीय संस्थांमधील रिक्त पदे भरण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसूल व पशुसंवर्धन मंत्री यांना दिनांक २५ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०३-२०२३) :** (१), (२) व (३)

हे खरे आहे.

जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची लेखी निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत. सदरहू निवेदनास अनुसरुन शासन आदेश

दि. २६/१२/२०२२ अन्वये जिल्हा परिषद, चंद्रपूर अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गातील एकूण ६ पदे भरण्यात आलेली आहेत.

तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक आयुक्त पशुसंवर्धन संवर्गातील ५६ पदे व पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २९८ पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. सदरहू उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर, याद्वारे रिक्त पदे भरण्याचे संकल्पित आहे.

---

**चंदगड तालुक्यातील ताम्रपणी नदीमधील वाळू उपसा होत नसल्यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाल्याबाबत**

**(२१) ५५४५३ (२९-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ताम्रपणी नदीमधील अनेक वर्षापासुन वाळू लिलाव प्रलंबित असल्यामुळे शासनास त्याच्या स्वामित्व धनापोटी (रॉयल्टी) कोटयवधी रुपयाचा महसुल मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपसा होत नसल्याने नदयाचे पात्र वाळूने भरल्याने पावसाळयात पाणी वाहून जाण्यास अडचणी निर्माण होवून महापूर येऊन गावाचे, बाजारपेठाचे व शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त लिलाव करण्याबाबत व शासनाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०२-२०२३) :** (१) व (२)

मा. राष्ट्रीय हरित न्यायाधीकरण, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या मूळ अर्ज क्र. ३६३/२०१५ व ३६६/२०१५ ते ३६८/२०१५ मध्ये मा. न्यायालयाने दिनांक १९/०४/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक २१/०४/२०१७ अन्वये सक्शन पंपाद्वारे करण्यात येणा-या वाळूच्या उत्खननावर बंदी घलण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्हयातील नदया हया बारमाही पाण्याखाली असतात. तसेच, सदर नद्यायावरती कोल्हापूर पध्दतीचे बंधारे असल्यामुळे नदी पात्र कोरडे पडत नाही. त्यामुळे वाळू लिलाव न झाल्याने शासनाच्या महसूलाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) येथील वन विभागातर्फे ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत झाडांच्या लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याबाबत

**(२२) ५५९१४ (२९-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील वन विभागातर्फे ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत आसनगाव हद्दीतील उपवन परिसरात हजारोच्या संख्येने वृक्षारोपण करण्यात आलेल्या झाडांची योग्य निगा न घेतल्यामुळे वृक्षारोपणावर केलेला लाखो रुपयांचा खर्च वाया गेल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रमांतर्गत सदर झाडांकडे वन विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याने किती वृक्ष उन्मळून पडून नुकसान होऊन त्यांचे जतन व संर्वधन करण्यासाठी कोणत्या उपाययोजना विभागाने केल्या वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वन विभागाच्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

शहापूर वनविभागात आसनगाव हद्दीतील उपवन परिसरात ३३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्ष लागवड करण्यात आलेली नसून सदरची लागवड ही सुशोभिकरणासाठी करण्यात आली आहे. सदर झाडांची योग्य ती निगा घेण्यात येते. त्यावर झालेला खर्च वाया गेल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) सुशोभिकरणासाठी लागवड करण्यात आलेल्या फुलझाडांची योग्य ती निगा मजुरामार्फत राखण्यात येत असल्यामुळे वृक्षांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा भाईंदर क्षेत्रातील मौजे भाईंदर येथील जमिनीवर रहात असलेल्या नागरीकांवर बेघर होण्याची वेळ आल्याबाबत

**(२३) ५६४८९ (२९-०१-२०२३). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर क्षेत्रातील मौजे भाईंदर स.क्र.३४२/१ या जमिनीवर राखीव वन स्थापित करण्यासाठी अधिसूचना काढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेचे सर्वेक्षण न करताच रहिवाशी क्षेत्रास राखीव वन म्हणून घोषित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच तेथे सुमारे ८० ते ९० वर्षांपासून रहात असलेल्या नागरीकांवर बेघर होण्याची वेळ आली असून यासंदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही या रहिवाश्यांना दिलासा मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०४-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे भाईंदर येथील सर्व्हे नं.३४२/१ मधील अंशत: क्षेत्राचा भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ नुसार राखीव वन म्हणून घोषित करण्याचा मानस दिनांक १२.१.२०२१ च्या अधिसूचनेव्दारे घोषित केला आहे.

मा.उच्च न्यायालयात दाखल रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार व महाराष्ट्र रिमोट सेंसिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) च्या नकाशानुसार सन २००५ मध्ये कांदळवन अस्तित्त्वात असणाऱ्या क्षेत्रास राखीव वन म्हणून जाहीर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र रिमोट सेंसिंग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) मार्फत पुरविण्यात आलेल्या नकाशांच्या आधारे नकाशामध्ये समाविष्ट क्षेत्राबाबत अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ च्या प्रारुप अधिसूचनेसंदर्भात हरकती किंवा दावे सादर करण्याची तरतुद आहे. त्यानुसार, प्रस्तुत दिनांक १२.१.२०२१ च्या अधिसूचनेबाबत नागरीकांकडून व मिरा भाईंदर महापालिकेकडून हरकती प्राप्त झालेल्या आहेत. सदर आक्षेपांची तपासणी व पडताळणी वन जमाबंदी अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडून करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात पाळीव प्राण्यांच्या लसीकरणाचे काम मंद गतीने होत असल्याबाबत

**(२४) ५६५२४ (१३-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)पुणे जिल्ह्यात पाळीव प्राण्यांमधील संसर्गजन्य असलेल्या लाळ्या व खुरकुत या रोगाच्या नियंत्रणासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेचे काम मंद गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील कामाची दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सद्य:स्थिती काय आहे, तसेच उद्दिष्टानुसार लसीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तिसऱ्या फेरीच्या लाळ खुरकुत रोगप्रतिबंधक लसीकरणासाठी पुणे जिल्ह्यात एकूण ९,७७,५७८ लसमात्रा दिनांक ७.१२.२०२२ रोजी पर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. त्यामधून दिनांक १९.०१.२०२३ पर्यंत ४,४९,५७६ (४६ टक्के गाय व महिष वर्गातील पशुधनास लाळ खुरकुत रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात आलेले आहे.

दिनांक २४.०४.२०२३ अखेर एकूण ९,१५,३९६ (९४ टक्के) पशुधनास लसीकरण पूर्ण करण्यात आलेले असून, केंद्र शासनाने विहित केलेल्या वाढीव कालावधीनुसार दिनांक ३१.०५.२०२३ अखेर १०० टक्के पशुधनास लसीकरण पूर्ण करण्यात येत आहे.

(३) व (४) बाबत प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कृषि विभागाच्या पदोन्नतीच्या नस्तीमध्ये फेरफार केल्याबाबत

**(२५) ५६६१९ (१३-०४-२०२३). श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषि विभागातील कृषि उपसंचालक दर्जाच्या अंदाजे ८१ अधिकाऱ्यांची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी पदावर पदोन्नतीची नस्ती विभागाने मुख्यमंत्री कार्यालयास सादर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार महिन्यांपासून प्रलंबित असणाऱ्या या नस्तीमधील अधिकाऱ्यांच्या पद:स्थापनेत आर्थिक व्यवहार होऊन काही जणांच्या पद:स्थापना बदलण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाब प्रसिध्दी माध्यमांसमोर निदर्शनास आल्याने उक्त नस्ती त्वरित मुख्यमंत्री कार्यालयात पाठविली असली तरी पुन्हा सदर नस्ती मुळ विभागास परत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त पदोन्नतीच्या पद:स्थापनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याने अधिकारी वर्गाने कामबंद आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (१७-०५-२०२३) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) सन २०२१-२२ या वर्षाच्या निवडसूचीनूसार कृषि उपसंचालक गट-अ संवर्गातील एकूण ७९ अधिकाऱ्यांना अधिक्षक कृषि अधिकारी, गट-अ पदांवर पदोन्नतीचे आदेश दिनांक ३०/१२/२०२२, दिनांक ३१/०१/२०२३, दिनांक २७/०२/२०२३, दिनांक ३१/०३/२०२३ व दिनांक ०५/०४/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मराठी चित्रपट अनुदान समिती अस्तित्वात नसल्याने शेकडो चित्रपटाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(२६) ५६७८९ (१३-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी चित्रपट अनुदान समिती अस्तित्वात नसल्याने शेकडो मराठी चित्रपटाचे अनुदान प्रलंबित असल्याचे तसेच अद्याप मराठी चित्रपट अनुदान समितीची पुनर्रचना केली नसल्यामुळे सुमारे २०४ मराठी चित्रपट अनुदानासाठी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी चित्रपट अनुदान समितीला वीस वर्षापूर्वी निश्चित केलेला ५ कोटी रुपये निधी, मराठी चित्रपटांची वाढती संख्या तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी प्रोत्साहित करण्यासाठी सदरहू चित्रपट समितीला शासनाने किमान ५० कोटी रुपये निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी चित्रपट निर्मात्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भांत शासनाने मराठी चित्रपट अनुदान समितीची पुनर्रचना करुन प्रलंबित असलेले मराठी चित्रपटांचे अनुदान विनाविलंब चित्रपट निर्मात्यांना वितरीत करण्याच्या दृष्टीने व पुढील दहा वर्षाचे सांस्कृतिक धोरण कार्यान्वित करण्यासाठी सन २०१० च्या धोरणात कालानुरूप बदल करण्यात येत असतानाच प्रलंबित शेकडो चित्रपटांच्या अनुदानात वाढ करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०२३) :** (१) , (२) व (३) होय, अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत महामंडळाकडे २०४ चित्रपटांचे परीक्षण (स्क्रीनिंग) करण्यासाठीचे प्रस्ताव प्राप्त झाले असून, शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०२३ व दिनांक ०३ मार्च, २०२३ अन्वये गठीत करण्यात आलेल्या परिक्षण समितीमार्फत चित्रपटांचे परीक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे. परीक्षणाअंती विहित प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पात्र चित्रपटांना अनुदान देण्यात येईल.

मराठी चित्रपट अनुदान समितीला निधी देण्याची मागणी प्राप्त झाली नाही. मात्र परिक्षणाअंती व शासन निर्णयातील तरतूदीनुसार अनुदानासाठी पात्र ठरलेल्या चित्रपटांना त्याच वित्तीय वर्षात अर्थसहाय्य देण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सद्य:स्थितीत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळालेल्या चित्रपटांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यात वाढ करण्याबाबतची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण देण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यात आल्याबाबत**

**(२७) ५६९७५ (१३-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बँकांमधील ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण देण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे काय तसेच त्याच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२८-०४-२०२३) :** (१) व (२)
राज्यात बँकांमधील ठेवींना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा संरक्षण कायद्याच्या धर्तीवर पतसंस्थांमधील ठेवींनाही विमा संरक्षण देण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदींनुसार स्थिरीकरण व तरलता निधी दिनांक ११.९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी नियामक मंडळाने ठरविलेल्या दराने व पद्धतीने पतसंस्थांनी अंशदान द्यावयाचे आहे. सद्यस्थितीत हा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा आहे. नियामक मंडळाने रु. ५०,००० पर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याबाबतची योजना प्रस्तावित केली असून सदर योजनेबाबत राज्यातील सर्व पतसंस्था फेडरेशनचे प्रतिनिधी यांच्यासोबत बैठक घेऊन त्यांनी केलेल्या सुचना/हरकती/निवेदने विचारात घेऊन योजनेस अंतिम स्वरुप देण्याबाबत नियामक मंडळाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथे चित्रनगरी उभारण्याबाबत**

**(२८) ५७०६९ (२०-०४-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक असलेल्या दादासाहेब फाळके यांचे नाशिक शहरात चित्रपटनगरी उभारण्याचे स्वप्न साकारण्याकरिता इगतपुरी तालुक्यातील महामार्गालगतच्या मुंढेगाव येथील गायरान जागा शासनाने मंजूर केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मुंढेगाव (ता.इगतपुरी) येथे चित्रनगरी उभारण्यासाठी योग्य जागा उपलब्ध असल्यामुळे ही जागा सांस्कृतिक कार्य विभागाच्या नावे करून नाशिक येथील चित्रनगरीचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास सांस्कृतिक कार्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२९-०५-२०२३) :** (१) नाही. मुंढेगाव, ता.इगतपुरी, मौ.राजूर बहुला, ता.नाशिक मौ.बिलोली ता.नाशिक येथील स.नं.४५९ येथील ५४.५८ हे. आर. पैकी ४७.८५ हेक्टर जमीन चित्रपटसृष्टी उभारण्यासाठी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे. त्यानुषंगाने शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथे इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थीसाठी वसतीगृह बांधकाम करण्याबाबत**

**(२९) ५७१९७ (१९-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) (शहर/ग्रामीण) भागातून इतर मागास प्रवर्गामधील मध्यमवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असून त्यांची राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे पैसे भरुन राहण्याची व्यवस्था करावी लागत असल्यामुळे त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थी अत्यंत गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील असल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी येत आहेत, त्यामुळे शहराच्या ठिकाणी राहण्याची चांगली व्यवस्था होण्याकरीता शासनामार्फत वसतीगृहाचे बांधकाम करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३१-०५-२०२३) :** (१) व (२) राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत विविध स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत सुरु करण्याबाबत दि.२९.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

तथापी, लोकप्रतिनिधी व विविध स्तरावरुन होत असलेल्या मागणीनुसार सदर वसतिगृहासाठी शासनाने स्वत: इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दि.२८.०२.२०२३ अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार वसतीगृह सुरु करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात हापूस आंबा बागायतदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केल्याबाबत

**(३०) ५७३४५ (२१-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात बदलत्या हवामानाने बागायतदार तसेच नैसर्गिक आपत्तींमुळे मागील आठ वर्षांपासून कोकणातील आंबा, काजू, नारळ, सुपारी बागायतदार आर्थिक संकटात सापडल्याने कोकण हापूस आंबा बागायतदारांनी सन २०१४-१५ या कालावधीत काढलेल्या कर्जातील ६ टक्के व्याजदर माफ करण्याच्या मागणीसाठी उत्पादक व उत्पादन विक्रेते सहकारी संस्था मर्यादित यांच्यावतीने रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०२२ व दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोकणातील आंबा बागायतदारांना कर्जमुक्ती देऊन सातबारा कोरा करावा व पुन्हा आंबा व्यवसाय उभा करण्यासाठी नवीन कर्ज उपलब्ध करुन द्यावीत, अशी मागणीही आंदोलनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून कर्ज माफीचा अध्यादेश होऊनही अर्थसंकल्पात तरतुदच न झाल्याने आंबा बागायतदार व्याजदर माफीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१९-०५-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) व (४) हे खरे नाही.

राज्यात माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २०१४ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे शेती/फळ पिकांचे झालेल्या नुकसानीकरीता आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत व सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार बाधीत शेतकऱ्यांचे तीन महिने व्याज माफ करण्यात आले आहे. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील पात्र ५५८ कर्जदार शेतकऱ्यांना देय व्याज माफीची रक्कम रूपये ५३,७१,३९५/- मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ३७४ शेतकऱ्यांना रूपये ३१,८१,३३६/- एवढी रक्कम अदा करण्यात आली आहे. १८४ कर्जदारांचे रूपये २१,९०,२५९/- इतकी रक्कम अदा करणे बाकी आहे.

बाधीत शेतकऱ्यांचे सन २०१४-१५ या कालावधीतील अल्पमुदत पीक कर्जाचे सन २०१५-१६ मध्ये मध्यम मुदत कर्जात रूपांतर/पुनर्गठन करणे आणि अशा रुपांतर/पुनर्गठन केलेल्या कर्जाचे सन २०१५-१६ मध्ये देय व्याज शासनाने भरणा करणे व त्यापुढील चार वर्षांचे म्हणजे सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या प्रत्येक वर्षाचे परतफेड केलेल्या हप्ता रकमेवरील ६% दराने व्याज शासनाने भरणा करणेबाबतचा निर्णय सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक २९/०७/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या सुचना सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे वन विभागांतर्गत खडकवासला विकास कामांमध्ये गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

**(३१) ५७५५६ (२१-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे वन विभागांतर्गत खडकवासला विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच किल्ले सिंहगड वाहनतळ येथील नियोजित कचरा प्रकल्पाचे निर्मितीसाठी जवळपास ८ लक्ष रुपयांची नवीन मशिनरीची चोरी झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किल्ले सिंहगडावर जाणाऱ्या पर्यटकांकडून वनसंरक्षण समिती, घेरा, सिंहगड यांचेकडून उपद्रव शुल्क जमा केले जाऊन जमा उपद्रव शुल्काचा विनियोग योग्य प्रकारे होत नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात वनसंरक्षण समिती घेरा सिंहगडचे उपद्रव शुल्क बॅंकेत भरण्यासाठी जाणाऱ्या समितीच्या कर्मचाऱ्यावर हल्ला करुन पाऊणे दोन लाख रुपये लुटूनही घटनेचा तपास करुन अद्यापही आरोपींना अटक झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच पुणे वन विभाग व उप वनसंरक्षक यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ व १५ एप्रिल, २०२२ रोजी वारंवार पत्रव्यवहार करुन देखील वेळेत उत्तर दिले जात नसून वन विभाग, पुणे यांच्याकडून उक्त गैरप्रकारांना पाठबळ मिळत असल्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन लोकप्रतिनिधी यांना सौजन्याची वागणूक मिळत नसल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०५-२०२३) :** (१) हे खरे नाही,
भांबुर्डा वन परिक्षेत्रातील मौजे खडकवासला येथे सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये कोणत्याही प्रकारची विकास कामे झालेली नाहीत. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही.
(२) हे खरे आहे,
किल्ले सिंहगड वाहनतळ येथील नियोजित कचरा प्रकल्पाचे विघटन करणारी मशीन दिनांक २२.१२.२०२२ चे दरम्यान अज्ञात चोरांनी चोरुन नेले असल्याचे निदर्शनास आले. सदर चोरी बाबत हवेली पोलिस स्टेशन येथे रितसर तक्रार दिनांक २३.१२.२०२२ रोजी नोंदविण्यात आली होती. त्यानुसार पोलीस यंत्रणा मार्फत तपास करुन मशीन चोरी केलेल्या आरोपींना ताब्यात घेण्यात आले होते. याप्रकरणी पुढील कायदेशीर प्रक्रीया चालू आहे.
(३) हे खरे नाही.
किल्ले सिंहगड या ठिकाणी जाण्याकरीता वनविभागाच्या माध्यमातून वनसंरक्षण समिती, घेरासिंहगड मार्फत पर्यटकांकडून शुल्क आकारण्यात येत असून, सदर प्रकरणी निधी मधून कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही. प्राप्त जमा व खर्च निधीचे प्रत्येक वर्षी लेखापरिक्षण करण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे,
वनसंरक्षण समिती घेरा सिंहगड अंतर्गत गोळेवाडी टोलनाका येथे दिनांक १०.०६.२०१६ ते १२.०६.२०१६ या कालावधीत वसूल केलेली प्रवेश व उपद्रव शुल्काची रक्कम रु.१,७०,४५०/- ही बॅक ऑफ महाराष्ट्र, खानापूनर येथे दिनांक १३.०६.२०१६ रोजी समितीच्या बॅक खात्यात भरणा करण्यासाठी समिती अंतर्गत कार्यरत सुरक्षारक्षक जात असताना अज्ञात व्यक्तींनी मिरचीपूड व घातक स्प्रेचा वापर करुन त्यांच्या कडील वरील रक्कम लूटमार करुन नेले असून त्यासंदर्भात दिनांक १३.०६.२०१६ रोजी वरिष्ठ पोलिस निरीक्षक, हवेली पोलीस स्टेशन येथे ग.र.नं.१६०/२०१६ IPC ३९२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. सदर गुन्हे संदर्भात तपासाबाबत पोलिस स्टेशन, हवेली यांचेकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला होता. त्याअनुषंगाने पोलिस निरीक्षक, हवेली पोलिस स्टेशन, पुणे ग्रामीण यांनी त्यांच्या वरिष्ठांना उद्देशून लिहिलेले पत्र दिनांक ११.०१.२०१८ अन्वये लुटमार करुन नेलेल्या रक्कमेचा तपास उघडीस येईल यांची शाश्वती नसल्याने दाखल तक्रार फाईल करणे बाबत पोलीस निरीक्षक हवेली पोलिस स्टेशन यांनी त्यांच्या वरीष्ठ कार्यालयास विनंती केलेली आहे.
(५) हे खरे नाही,
दिनांक ३० सप्टेंबर, २०२१ व १५ एप्रिल, २०२२ रोजीचे संदर्भान्वये मौ.पाचगांव पर्वती येथील माहिती मिळणेबाबत पत्रव्यवहार करणेत आला होता. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, भांबुर्डा यांनी लोकप्रतिनिधी यांचेशी वनपर्यटन संदर्भात समक्ष भेट घेवून सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली आहे.
(६) हे खरे नाही,

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ऊसतोडणी यंत्रधारकांना अनुदान देण्याबाबत

**(३२) ५८२९१ (२१-०४-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऊस तोडणीसाठी मजूरांची वानवा व ऊसतोड मजुरांकडून वाहनधारकांची होणारी आर्थिक फसवणूक यावर पर्याय व झटपट तोडणीसाठी यांत्रिकीकरण होण्यासाठी ऊस तोडणी यंत्रधारकांना मिळणारे अनुदान मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने स्वत:च्या वाटणीचा हिस्सा मंजूर केला असला तरी उर्वरित राज्य शासनाचा हिस्सा अद्यापही जमा न केल्याने हे अनुदान तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन निधीची तरतूद करुन सदरील अनुदान ऊसतोडणी यंत्रधारकांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२२-०५-२०२३) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY) अंतर्गत सन-२०२२-२३ व सन-२०२३-२४ या दोन वर्ष कालावधीत ९०० ऊस तोडणी यंत्र खरेदीवर खरेदी किंमतीच्या ४०% अथवा रू.३५ लाख यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदान स्वरूपात देणेबाबत

दि.२०/०३/२०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील वाळू गटासाठी भरणा केलेली रक्कम लिलाव धारकास परत करण्याबाबत

**(३३) ५८४६५ (२१-०४-२०२३). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील शुक्लतिर्थ निमगाव १, शुक्लतिर्थ निमगाव २ व मोगरा या वाळू गटासाठी भरणा केलेली २५ % रक्कम लिलाव धारकास परत करण्याबाबत राज्य शासनाच्या महसूल विभागाने दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी यांच्याकडुन अहवाल प्राप्त झाला आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :** (१), (२) व (३) मौजे शुक्लतिर्थ निमगाव-१, शुक्लतिर्थ निमगांव-२ व मोगरा, ता. माजलगाव, जि. बीड या वाळू गटासाठी भरणा केलेली २५% रक्कम परत करण्याबाबत लिलावधारक यांच्याकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक २७.०९.२०२२ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड

यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. परंतू, जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून या प्रकरणी शासनास अद्याप अहवाल अप्राप्त आहे.

---

**समृद्धी महामार्गाच्या बांधकामावेळी करण्यात आलेले बेकायदा गौण खनिज उपसा व उत्खनन**

**(३४) ५८५१४ (२१-०४-२०२३). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या कंत्राटदारांना कोट्यवधींचे दंड माफ केल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विनापरवानगी व नियमाचे उल्लंघन केल्यामुळे जालना व बदनापूर वर्धा, कळझर, खापरी, सिंदखेडराजा, अमरावती, नांदगाव खंडेश्वर येथील तहसीलदारांनी अनुक्रमे ३२८, २३९, २१.६४, २५.६६ कोटी एवढ्या मोठ्या प्रमाणात दंड ठोठावला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोटयवधीचे अवैधगौण खनिज नियमबाह्य उत्खनन केल्याप्रकरणी तहसीलदारांनी ठोठावलेला दंड आकारणी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे
(३) व (४) हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे राज्याच्या दृष्टीने महत्व विचारात घेता सदर महामार्गाच्या बांधकामासाठी अनाधिकृत उत्खनन करुन वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या अनुषंगाने क्षेत्रीय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रीय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने मा. मंत्रीमंडळापुढे सादर केलेल्या प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाच्या दिनांक १७.११.२०२२ च्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या गौण खनिजाबाबत क्षेत्रीय महसूल यंत्रणेमार्फत निर्गमित केलेले सर्व दंडनीय कारवाईचे आदेश व क्षेत्रीय महसूल यंत्रणेसमोर दंडनीय कारवाईबाबत सध्या सुरु असलेली सर्व प्रकरणे रद्द करण्यात आली आहे.

---

**शहापूर (जि. ठाणे ) तहसिल कार्यालयात अनागोंदी कारभारामुळे शेतकरी व सामान्य जनतेला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याबाबत**

**(३५) ५८७७९ (२१-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) येथील तहसिल कार्यालयातील गैरकारभारामुळे शेतकरी व सामान्य जनता यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदगांव सोगावला राहणा-या कांताबाई धानके यांचा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५५ बाबतचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान तहसील कार्यालयात सादर करण्यात आला व अनेक महिने उलटले तरी तलाठयांनी त्यांच्याकडे हे प्रकरण आले नसल्याचे सांगितले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०५-२०२३) : (**१), (२), (३) व (४) मौजे पळसोली (सो.), ता. शहापूर, जि. ठाणे येथील स. नं. ७२ या जमिनीचे संगणकीकृत गाव नमुना नं. ७/१२ सदरी श्रीमती कांताबाई धानके व इतर यांचे नाव व क्षेत्र दुरुस्तीकरीता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ नुसार तहसिलदार, शहापूर यांचे कार्यालयात अर्ज दाखल झाला होता.

संगणकीकृत गाव नमुना नं. ७/१२ अभिलेख अद्ययावत करताना जमिनीचे ७/१२ सदरी नांव व क्षेत्र यासंदर्भात लेखन प्रमादाची चूक घडली असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्यामुळे तलाठी साझा, सोगाव यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ नुसार प्रस्ताव तहसिलदार, शहापूर यांचेकडे सादर केला होता. तहसिलदार, शहापूर यांनी अर्जदार यांची उपरोक्त विनंती अमान्य केली होती.

प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, शहापूर यांनी केलेली कार्यवाही महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे नियम ३ (१) (दोन), नुसार प्रशासकीयदृष्टया अयोग्य असून त्यांनी नेमून दिलेल्या कामकाजात कर्तव्यपरायणता राखलेली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्यामुळे उक्त नियमानुसार त्यांचेकडून खुलासा सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिले आहेत.

उपरोक्त जमिनीचे हस्तलिखित गाव नमुना नं.७/१२ नुसार संगणकीकृत ७/१२ सदरी योग्य ती दुरूस्ती करुन अद्ययावत गाव नमुना नं.७/१२ उतारे संबंधितांना उपलब्ध करून देण्यात यावे तसेच अशा प्रकारची अन्य लेखनप्रमादाची आणखी किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याची तपासणी करुन त्याबाबत देखील नियमोचित कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील १४ बोगस सोसायट्या रद्द करण्याबाबत**

**(३६) ५९३१८ (२१-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील १४ बोगस सोसायट्या रद्द करण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त १४ बोगस सोसायट्यामध्ये दुसऱ्या गावातील सदस्यांची नावे असली तरी काही नावे सगळयाच सोसायट्यामध्ये आढळून येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संस्था चालकांच्या यादीतील १३ पैंकी तीन ते चार नावे दुसऱ्या संस्थेतील संचालकाचे आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०८-०५-२०२३) :**(१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी सहायक निबंधक, सहकारी संस्था, द. सोलापूर यांना दिलेल्या आदेशानुसार ६ अधिकाऱ्यांची १४ संस्थांसाठी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. तथापि, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांचे पत्रास मा. उच्च न्यायालयाने दिनांक १३/०१/२०२३ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असल्यामुळे सदर संस्थांचे चौकशीचे कामकाज स्थगित ठेवण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उत्खननाला आळा घालण्याबाबत

**(३७) ५९३९५ (२१-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील महसूल व पोलिसांच्या पथकाने अनधिकृत वाळू वाहतूक रोखण्यासाठी दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मध्यरात्री कारवाई करुन २८ डंपर व २५० ब्रासहून अधिक वाळूचा साठा जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उत्खननाला आळा घालण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :**(१),(२) व (३)

तहसिलदार कार्यालय मालवण यांच्या पथकाने दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी मौजे देवली सडा-माळरान व मौजे आंबेरी, ता.मालवण येथे अनधिकृत वाळू वाहतूक करणाऱ्या २८ डंपरवर जप्तीची कारवाई करुन सदर ठिकाणी १४६७ ब्रास इतका अनधिकृत वाळू साठा जप्त केलेला आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गौण खनिजाचे अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गस्ती पथके, स्थिर पथके तसेच, महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

सिंधुदूर्ग जिल्ह्यात दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०१/२०२३ पर्यंत गौण खनिजाच्या एकूण १३५ अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी रु.१,६३,९२,६७०/- इतक्या दंडाची आकारणी करुन ०२ प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

## राज्यात भूविकास बँकेमधील कर्जदार शेतकऱ्यांच्या थकीत रकमेची कर्जमाफी व कर्मचाऱ्यांची देणी देण्याबाबत

**(३८) ५९६८२ (१९-०४-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३३,८९५ भूविकास बँकेमधील कर्जदार शेतकऱ्यांच्या थकीत रकमेची कर्जमाफी व कर्मचाऱ्यांची देणी देण्याबाबत दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन वित्तमंत्री तथा उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सहकार विभागाने समिती नेमून कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले असून समितीने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात भूविकास बँकेतील शेतकऱ्यांची कर्जमाफी व कर्मचाऱ्यांची देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (२८-०४-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) शासनाने भुविकास बँकांबाबत दिनांक ०९.११.२०२२ रोजी धोरणात्मक निर्णय घेतला असून त्यानुसार भुविकास बँकांच्या ३४,७८८ कर्जदार शेतकऱ्यांची ९६४.१५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात आली आहे. तसेच राज्यातील भुविकास बँकांच्या सेवानिवृत्त / कार्यरत / कंत्राटी कर्मचाऱ्यांची एकूण थकीत देणी अंदाजे रुपये २७५.४० कोटी इतकी रक्कम अदा करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला असून दिनांक २८.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर रक्कम सहकार आयुक्त कार्यालयास वितरीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोदवड (जि.जळगाव )तालुक्यातील जलचक्र खुर्द येथील मे. महालक्ष्मी स्टोन क्रशर धारकाने केलेले अवैध खनिज उत्खनन

**(३९) ६०८८७ (२१-०४-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील जलचक्र खुर्द येथील २८/२ मध्ये मे.महालक्ष्मी स्टोन क्रशर धारकाने सन २०१७ ते डिसेंबर, २०१९ या कालावधी दरम्यान सदरील जमिनीतून लाखो ब्रास गौण खनिज उत्खनन करुन अवैध विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलचक्र खुर्द येथील २८/२ ही वर्ग २ ची जमिन असून शेती प्रयोजनार्थ वापर करणे बंधनकारक असतांना त्या जमिनीचा वाणिज्य वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदरील प्रकरणी नेमलेल्या समितीने चौकशी करुन केवळ ४२९४.२१ ब्रासच्या उत्खननावर दंड आकरण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्टोन क्रशरधारकांवर गौण खनिज चोरी प्रकरणी दंडात्मक कारवाई अपेक्षित असतांना प्रांत व बोदवड तहसिलदार यांची फक्त स्वामित्व धन फरकाची रक्कम वसूल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकाराची चौकशी करुन संबंधित प्रशासनातील अधिका-यांवर व स्टोन क्रशर मालकांवर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :**(१), (२), (३), (४), (५) व (६)

मे. महालक्ष्मी स्टोन क्रशर यांनी मौजे. जलचक्र खुर्द, ता. बोदवड (जि.जळगांव) येथील गट क्र.२८/२ मधुन केलेल्या उत्खननाची ईटीएस (ETS) मोजणी केली असता एकुण ३०,६६४ ब्रास उत्खनन केल्याचे आढळून आहे. संबंधित क्रशरधारक यांनी माहे जानेवारी, २०१५ ते जुन २०२१ दरम्यान एकूण २६३६९.७९ ब्रासचे स्वामित्तधनाचा भरणा केलेला असून उर्वरीत ४२९४.२१ ब्रास गौण खनिज तफावतीच्या अनुषंगाने तहसिलदार, बोदवड यांनी दिनांक २४.०२.२०२३ अन्वये एकुण रु.४,४४,६६,५४५/- एवढया रकमेचे दंडात्मक आदेश पारित केले आहेत. त्यानुसार वसुलीची पुढील कार्यवाही सुरू आहे.

संबंधित क्रशरधारक यांनी मौजे जलचक्र खुर्द येथील गट नं.२८/२/पै/९ या जमिनीच्या वाटप परवानगी आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याने सदर जमिन जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक २७.०२.२०२३ च्या आदेशान्वये सरकारजमा केली आहे.

---

## पालघर जिल्ह्यातील बोईसर व सरावली बेटेगाव परिसरातील शासकीय जागेवर भूमाफियांकडून अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४०) ६१०७७ (२१-०४-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील बोईसर व सरावली बेटेगाव परिसरात रुग्णालय, शाळा, अंगणवाडी इ.साठी जागा मिळणे अवघड झाले असताना भूमाफिया मोकळया सरकारी जागा बळकावून त्यावर बेकायदेशीररित्या कब्जा करण्याच्या उद्देशाने अनधिकृत इमारती, चाळी, गोदामे आदींची बांधकामे मोठया प्रमाणात करत असताना या सर्व अतिक्रमणांविरोधात पालघर महसूल विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट कागदपत्रे तयार करून सरावली परिसरातील झोपडपट्टी भागातील सरकारच्या नावे असलेल्या मोकळया जागा बळकावून त्यावर अनधिकृत घरे, व्यापारी गाळे, इमारती आणि गोदामे बांधण्यासाठी भूमाफियांच्या टोळया कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार सदरहू भूमाफियां विरोधात कारवाई करण्यासंदर्भात तसेच अनधिकृत बांधकामे हटविण्याबाबत शासकीय कामकाजाकरिता जागा उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०४-२०२३) :**१), २), ३) व ४) पालघर जिल्ह्यातील मौजे बोईसर व सरावली परिसरात शासकीय जमिनी असून सदर जमिनीवर पूर्वापार लोकांनी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमणे केली आहेत. शेतीच्या प्रयोजनासाठी नवीन शर्तीने वाटप केलेल्या जमिनीवर अनधिकृत बांधकामे झालेली असल्यामुळे सदर जमिनी या महाराष्ट्र शासनाच्या नावे वर्ग केल्या आहेत. उक्त जागेवर नव्याने झालेली अनधिकृत बांधकामे महसूल विभागाकडून वेळोवेळी निष्कासित केली आहेत.

मौजे सरावली येथील शर्तभंगामुळे सरकार जमा झालेली जमीन नोटरी करार करून खरेदी केल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुषंगाने स्थानिकांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर बोईसर पोलीस स्टेशनला लेखी तक्रार करण्यात आली होती.

मौजे बेटेगांव येथील काही शासकीय जमिनीवर अतिक्रमणे असून सदर जमिनीवरील अतिक्रमणे महसूल यंत्रणेमार्फत दूर केली आहे. काही जागा अतिक्रमण विरहीत असून वाटपास शिल्लक आहे.

मौजे बोईसर येथील संजयनगर व भैय्यापाडा (सिध्दार्थनगर) या ठिकाणी अंगणवाडीसाठी जागा मिळणेबाबत विनंती बालविकास प्रकल्प अधिकारी ए. बा. वि.से.यो. प्रकल्प यांनी तहसिलदार, पालघर यांचेकडे केली आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

## बुलढाणा जिल्हयातील मागासवर्गीय आणि आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ जनावरे व शेळीगट वाटप न झाल्याबाबत

**(४१) ६१२८८ (१९-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील दुधाळ जनावरे व शेळीगट वाटप योजनेअंतर्गत मागासवर्गीय आणि आदिवासी लाभार्थ्यांची निवड होऊनही आतापर्यंत त्यांना म्हशी आणि शेळया मिळाल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले
आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लाभार्थ्यांना कधीपर्यंत म्हशी व शेळयांचे वाटप करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, बुलढाणा अंतर्गत सन २०२१-२२ या वर्षामध्ये खालील नमूद योजना ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आलेल्या आहेत.

अ.क्र. वर्ष योजनेचे नांव प्राप्त तरतूद (लक्ष) मंजूर लाभार्थी प्रत्यक्ष लाभ
दिलेले लाभार्थी

१ २०२१-२२ SCP-गाय गट वाटप १२५.०० १९५ १८१

२ SCP- शेळी गट वाटप १२५.०० १७० १५२

३ OTSP- गाय गट वाटप २०.०० ३१ २७

४ OTSP-शेळी गट वाटप १०.०० १७ ११

उर्वरित लाभार्थ्यांना शेळी व गाय गट प्रत्यक्ष पुरवठा करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

राज्यात माहे सप्टेंबर, २०२२ पासून गोवंशीय पशुधनामध्ये लम्पी चर्मरोग उद्भवल्यामुळे गुरांचे आठवडी बाजार बंद ठेवण्यात आलेले असल्यामुळे गाय गट खरेदीस विलंब झालेला आहे. आता गुरांचे आठवडी बाजार पुर्ववत सुरू झाल्यामुळे गटांची खरेदी प्रक्रिया सुरू आहे.

---

**अंबरनाथ (जि.ठाणे) येथील सूर्योदय सोसायटीचे शर्तभंग नियमानुकुल करण्याच्या शासन निर्णयाच्या कालावधीत वाढ करण्याबाबत**

**(४२) ६१९४६ (२१-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्था व डी.डी.स्कीम –१५ मधिल सदनिका व भूखंड धारकांना निवासी प्रयोजनार्थ वाटप करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील आढळून आलेले शर्तभंग नियमानुकूल करण्याकरिता घेतलेल्या धोरणात्मक शासन निर्णयाचा कालावधी वाढवून देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधिंनी निवेदनाद्वारे राज्याचे मा.मुख्यमंत्री तसेच महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३१ जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशिया खंडातील सर्वात मोठी गृहनिर्माण संस्था असलेल्या सूर्योदय सोसायटी तसेच डी.डी.स्कीम –१५ मधील सदनिका व भूखंडाचे शर्तभंग नियमानुकूल करण्याची एकूण १३१० प्रकरणापैकी केवळ ३३३ प्रकरणांचा शर्तभंग नियमानुकूल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या शासन निर्णयाच्या कालावधीत वाढ करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०५-२०२३) :**१) होय, हे खरे आहे.

२) अंबरनाथ तालुक्यातील सूर्योदय व इतर तत्सम सहकारी गृहनिर्माण संस्थांना निवासी प्रयोजनासाठी वाटप करण्यात आलेल्या भूखंडांची संख्या १३१० असून त्यापैकी शर्तभंग झालेल्या ८७३ प्रकरणांपैकी ३३९ प्रकरणी शर्तभंग नियमानुकूल करण्यात आले असून उर्वरित ५३४ प्रकरणी शर्तभंग नियमानुकूल करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना तहसीलदार, अंबरनाथ यांचेमार्फत नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.

३) व ४) ठाणे जिल्ह्यातील सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्था, अंबरनाथ व इतर तत्सम सहकारी गृहनिर्माण संस्था यांना निवासी प्रयोजनार्थ वाटप करणेत आलेल्या शासकीय जमिनीवरील आढळून आलेले शर्तभंग नियमानुकूल करण्याबाबत महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १३.०४.२०१७ अन्वये दिशा निर्देश तसेच दिनांक १५.०९.२०१८ अन्वये सुधारीत व पूरक दिशा निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार शर्तभंग नियमितीकरणाची योजना यापूर्वी झालेल्या हस्तांतरणासाठीच व दिनांक १३.०४.२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून फक्त तीन वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजेच दिनांक १२.०४.२०२० पर्यंत लागू होती.

तदनंतर महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १५.०३.२०२१ नुसार उक्त धोरणास सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन वर्षाची अंतिम मुदतवाढ देण्यात आली असून सदरची मुदत दिनांक १४.०३.२०२३ रोजी संपुष्टात आली.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दिनांक १५.०३.२०२१ नुसार उक्त धोरणास सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन वर्षाची अंतिम मुदतवाढ देण्यात आली असल्यामुळे पुनश्च: मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

---

**राज्यातील मिठागरांच्या जमिनींचा लिलाव करण्याचे धोरण केंद्र सरकारकडून आखले जात असल्याबाबत**

**(४३) ६२००८ (२१-०४-२०२३). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मिठागरांच्या जमिनींचा लिलाव करण्याचे धोरण केंद्र सरकारकडून आखले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामध्ये वसई, विरार भागातील वनराशी, आगरवती, सलाम, हिरागर, शेणखई, गुरुप्रसाद, जुना वचक, नवामुख अशा विविध प्रकारच्या २५ ते ३० मिठागरांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील मीठ उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०४-२०२३) :**१), २), ३) व ४) सदर विषयाच्या अनुषंगाने भारत सरकारच्या उद्योग संवर्धन आणि आंतरीक व्यापार विभाग, वाणिज्य एवं उद्योग मंत्रालयाकडून कोणतेही आदेश/सूचना प्राप्त झाले नसल्याचे मीठ उप आयुक्त, मुंबई यांनी दिनांक २२.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सबब, प्रश्न उदभवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यासाठी घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास रेती मोफत देण्याबाबत**

**(४४) ६२६११ (०३-०५-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात घरकुलधारकांना ५ ब्रास रेती मोफत देण्याचा शासन निर्णय असतांनाही गडचिरोली जिल्ह्यात या निर्णयाची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्ह्यात रेतीचा साठा सर्वाधिक असूनही अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे घरकुलधारकांना रेती उपलब्ध करुन न देता ती बाहेर जिल्ह्यांमध्ये मोठया प्रमाणावर विक्री केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अधिकाऱ्यांच्या संगनमताने रेती तस्करांना रेतीची तस्करी करू दिली जात आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन घरकुलधारकांना मोफत रेती उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :**(१),(२),(३),(४) व (५) महाराष्ट्र जमिन महसूल (गौण खनिजाचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मधील, तरतुदीनुसार घरकुल धारकांना ५ ब्रास रेती मोफत देण्याची तरतूद आहे. सदर नियमानुसार आज पावेतो गडचिरोली जिल्ह्यात एकूण ८१३१ घरकुल लाभार्थ्यांना ४०,६३२ ब्रास वाळु उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत रेती उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व तहसिलदार यांना सूचना देण्यात आल्या असुन त्याप्रमाणे कार्यवाही सूरू आहे.

गडचिरोली जिल्ह्यात सन २०२२-२३ मध्ये एकुण १९५ अवैध प्रकरणांत दंडाची कार्यवाही करण्यात आलेली असून १.७८ कोटी इतका दंड वसुल करण्यात आलेला आहे.

---

**मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे भूमाफियाने बेकायदेशीरपणे चाळीचे बांधकाम केल्याबाबत**

**(४५) ६२८४१ (२१-०४-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खडवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर १३ /२ या श्री. सुधीर गुप्ते यांच्या खाजगी स्वमालकीच्या

जागेत एका त्रयस्त भूमाफियाने बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात चाळीचे बांधकाम केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त जागेत अनधिकृत व बेकायदेशीरपणे चाळीचे बांधकाम करून त्याची विक्री करून सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अनधिकृत चाळी निष्कासित करुन भूमाफियावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०५-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे खडवली, ता. कल्याण, जि, ठाणे येथील स. नं. १३/२, क्षेत्र ०-९०.१० हे. आर या जमिनीच्या गाव नमुना नं. ७/१२ उता-यावर भोगवटदार सदरी श्री. सुधीर गुप्ते व इतर यांचे नाव दाखल आहे.

सदर जागेची मंडळ अधिकारी, नडगांव यांनी स्थळपाहणी केली असता, उक्त जमिनीवर श्री. अक्षय नामदेव पाटोळे यांनी १२ चाळीचे अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर चाळीचे बांधकाम करण्यापूर्वी जमीन मालक अथवा त्र्ययस्थ इसम यांनी कोणत्याही सक्षम प्राधिका-याची परवानगी घेतली नाही. त्यामुळे तहसिलदार, कल्याण यांनी दिनांक २३.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२,५३,५४ मधील तरतूदीनुसार जमीन मालक व त्रयस्थ इसम यांना नोटीस दिली असून खुलासा मागविला आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावीत आहे.

---

**मौजे सावंगी (ता.जि.औरंगाबाद) येथील मुरूम उत्खनन केल्याबाबत**

**(४६) ६२९०३ (२१-०४-२०२३). श्री.हरिभाऊ बागडे (फुलंब्री) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सावंगी (ता.जि.औरंगाबाद) येथील देवगिरी सहकारी साखर कारखान्याच्या जमिनीतून मोठ्या प्रमाणात मुरूमाचे अवैध उत्खनन केल्याने जमीन नापीक झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त किती ब्रास मुरूम उत्खनन झाले याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :** (१), (२) व (३) तहसीलदार औरंगाबाद (ग्रामीण) यांनी केलेल्या चौकशीमध्ये मौजे सावंगी, ता.जि.औरंगाबाद येथे देवगीरी सहकारी साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तथा तत्कालीन चेअरमन यांच्या नावे असलेले गट नंबर ४१,४३,४४,४६,५३ व ५४ या मधून गौण खनिजाचे बेकायदेशीर रित्या उत्खनन नेमके कोणी केले आहे निष्पन्न झाले नाही.

सन्मानीय सदस्यांनी सन २०२२ चे हिवाळी अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचना क्र.१८०३ च्या अनुषंगाने शासनाने दिनांक १०.०१.२०२३ च्या पत्रान्वये गौण खनिज उत्खननामध्ये झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना आले असुन, त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक १२.०१.२०२३ च्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र चौकशी समिती गठीत केली आहे. सदर समितीने स्थळ पाहणी करून मोजणी व चौकशी केलेली आहे. त्यानुषंगाने पुढील कारवाई सुरू आहे.

---

### राज्यात अंडी उत्पादनाला चालना मिळण्याकरीता योजना राबविण्याबाबत

**(४७) ६२९६८ (१९-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंडी उत्पादनाला चालना मिळावी याकरिता योजना राबविण्याचा निर्णय पशुसंवर्धन विभागाने माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उत्पादनाबाबत कोणत्या उपाययोजना राबविण्यात येणार आहे, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे, या निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०५-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, खाजगीरित्या कुक्कुट पालन करणारे शेतकरी तसेच, कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या कंपन्या यांना कुक्कुट पालन व्यवसाय करतांना येणाऱ्या अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी दिनांक २१.११.२०२२ राजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रात राज्यस्तरीय कुक्कुट समन्वय समितीचे गठन करण्यात आलेले आहे.

या समितीमध्ये राज्याच्या वेगवेगळया भागातील कंत्राटी पध्दतीने मांसल कुक्कुट पालन व्यवसाय, ओपन पध्दतीने मांसल कुक्कुट पालन व्यवसाय व अंडी उत्पादन करणारे कुक्कुट पालक व्यावसायिक, खाजगी कुक्कुट व्यवसाय करणाऱ्या (पिल्ले व खाद्य) कंपन्या, राज्य स्तरीय बँकर्स समितीचे प्रतिनिधी तसेच, NECC च्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आलेला आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याकरिता शासकीय दूध डेअरी परिसरामधील जागा हस्तांतरण करण्याबाबत

**(४८) ६३६७६ (१९-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याकरिता नगरपरिषद, धाराशिव यांनी सर्वे क्र. ४२६ मधिल शासकीय दूध डेअरी परिसरामधील समोरील जागा हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागा ही आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मुंबई यांच्या मालकी हक्कात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जागा हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी धाराशिव यांच्यामार्फत प्रधान सचिव, कृषी पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास यांच्याकडे प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याकरिता उक्त जागा हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०५-२०२३) :** (१), (२) व (३) होय.

(४) शासन निर्णय दिनांक ११/११/२००२ नुसार बंद पडलेल्या शासकिय दूध योजनांची जागा मालमत्ता फक्त जिल्हा/तालुका सहकारी संघांना देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आधुनिक शेती व पशुपालक आर्थिक संकटात सापडल्याबाबत**

**(४९) ६३७४४ (१९-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आधुनिक शेती व पशुपालन हा व्यवसाय जोमाने सुरु असताना वातावरणातील बदल, तसेच वाढती महागाई व पशुखाद्याच्या वाढणा-या किंमती यामुळे शेतकरी पशुपालक दुहेरी आर्थिक संकटात सापडले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्हयातील तसेच राज्यातील शेतकरी पुरक उद्योगधंदा म्हणुन पशुपालनही करित असतो परंतु पशुखाद्याच्या वाढत्या किंमतीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत,हे खरे आहे काय,
(३)असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१५-०५-२०२३) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) पशुपालकांचा पशुखाद्यावरील खर्च कमी व्हावा आणि पशुधनास आवश्यक हिरवी वैरण उपलब्ध व्हावी याकरिता पशुसंवर्धन विभागामार्फत वैरण पिकांच्या सुधारित प्रजातींच्या बियाणांचे व बहुवार्षिक वैरण पिकांच्या ठोंबांचे वितरण करण्यात येते.

सन २०२२-२३ मध्ये विविध योजनांमधून आंबेगाव तालुक्यातील पशुपालकांना ३,००६ कि.ग्रॅ. विविध वैरण बियाणांचे व २,४५,१६८ ठोंबांचे वितरण करण्यात आलेले आहे.

सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत आंबेगाव तालुक्यातील दुग्धोत्पादनात घट झाल्याचे दिसून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात कृष्णाई कन्स्ट्रक्शन कंपनी प्रकल्पांच्या कामाकरिता मुरुम उत्खनन करत असून त्याचा मोबदला शेतकऱ्यांना मिळत नसल्याबाबत**

**(५०) ६३९५१ (२१-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयात कृष्णाई कन्स्ट्रक्शन कंपनीचे मडाखेड, वडशिंगी, भेंडवळ यासह उकली, पातुर्डा, खांडवी, कवठळ या ठिकाणी मोठया प्रकल्पांची कामे सुरु असून परिसरातील शेतातून हजारो ब्रास मुरुम उचलत असून त्यांचा मोबदला कवडीमोल देत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावर कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यातयेत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२४-०५-२०२३) :** (१) जळगांव जिल्हयात कृष्णाई कन्स्ट्रक्शन कंपनीचे मडाखेड, वडशिंगी, भेंडवळ यासह उकली, पातुर्डा, खांडवी, कवठळ या ठिकाणी मोठया प्रकल्पांची कामे सुरु असून परिसरातील शेतातून हजारो ब्रास मुरुम उचलत असून त्यांचा मोबदला कवडीमोल देत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आलेले नाही अथवा त्याबाबतची तक्रार जिल्हाधिकारी जळगाव यांना प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव -१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.